सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Ph.No : (0721) 2573027, 2572577
Website: www.jdroamt.org Email: roamravati@dtemaharashtra.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२३/ 1906
दिनांक :- 12/7/2023

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या पदवीका/पदवी
व पदव्युत्तर पदवी संस्था, अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहीती पडताळणी करुन अद्ययावत करण्याबाबत.**

**संदर्भ :-** १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १०/एडीएम/Intake Approval/२०२३/४४४ दिनाक १३जुन २०२३.
२. २अ/एडीएम/Intake Approval/२०२३/१९३ दिनाक २२ जुन २०२३.
३.या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२३/१६५२ दिनांक १४ जुन २०२३.
४. विकाअ/शिक्षण/२०२३/१७०९ दिनांक २२ जुन २०२३.
५.विकाअ/शिक्षण/२०२३/१८५८ दिनांक ६ जुलै २०२३.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या पदवीका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरीता सहभागी होणा-या संस्थांनी आवश्यक कागदपत्रे सादर करुन अभ्यासक्रम व प्रवेशक्षमतेची माहीती अचूक व अद्ययावत करण्याबाबत या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक ३, ४ अन्वये आपणास कळविलेले आहे. तसेच संदर्भ ५ अन्वये ज्या संस्थांनी माहीती अपडेट करुन या कार्यालयाचे लॉगीनमधुन Approve (पडताळणी) केलेली आहे अश्या संस्थांनी संस्थेच्या लॉगिनमधून सदर माहीती बरोबर आहे किंवा नाही याची तपासणी करावी व त्यामध्ये काही तफावत असल्यास आजच **दिनांक १२/७/२०२३ रोजी संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत** या कार्यालयास सबंधित काम हाताळणा-या अधिकारी यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहुन त्यामध्ये दुरुस्ती करुन घ्यावी. तसेच त्यामध्ये काही त्रृटी नसल्यास त्याबाबत सुध्दा पत्राव्दारे कळवावे. आपण तसे न कळविल्यास सदर माहीती बरोबर असल्याचे गृहीत धरुन तसे तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना या कार्यालयाव्दारे कळविण्यात येईल. भविष्यात माहीतीमध्ये तफावत आढळल्यास व आपल्या संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत भविष्यात काही अडचणी उद्‌भवल्यास आपण स्वतः जबाबदार राहाल, याची संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी.

**( म.म. अंधारे)**
सहा.संचालक(तांत्रिक)
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळार प्रदर्शित करण्यासाठी.